**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः ताक्रीसं १४१५/प्र.क्र.१३९/क्रीयुसे १**

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

तारीख : २० जून, २०१५

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांकः सामाजिक न्याय व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो २००३/(प्र.क्र.११)/ क्रीयुसे १, दिनांक २६.०३.२००३.**

२) **शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.राक्रीधो २००९/(प्र.क्र.२५/०९)/ क्रीयुसे १, दिनांक २१.०३.२००९.**

३) **शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.१३११/प्र.क्र.२६२/पुनर्बांधणी धारीका-७/ क्रीयुसे १, दिनांक १९ सप्टेंबर, २०१४.**

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत विभागीय / जिल्हा /तालुका क्रीडा संकुलांची उभारणी करण्याची योजना दिनांक २६.०३.२००३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. या संकुलांची उभारणी स्वतंत्र व नोंदणीकृत क्रीडा संकुल समितीमार्फत होत आहे. या क्रीडा संकुलाचे अनुदान मर्यादा दिनांक २१.०३.२००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र.३ च्या शुध्दीपत्रकान्वये तालुका क्रीडा संकुल समितीच्या आंमत्रितांच्या यादीमध्ये तालुक्यांचे आमदार यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. मार्च २०१५ च्या विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्यातील क्रीडा संकुलांच्या संदर्भात उभारणी सदंर्भात झालेल्या चर्चेच्यावेळी मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांनी संबंधित तालुक्यातील आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबतची घोषणा केली होती. त्यानुसार तालुका क्रीडा संकुलाच्या उभारणीमध्ये संबंधित तालुक्यांच्या आमदारांचा सक्रीय सहभाग होण्याची आवश्यकता विचारात घेता तालुका क्रीडा संकुल समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

उपरोक्त पाश्र्वभूमीवर यापूर्वी तालुका क्रीडा संकुल समितीच्या रचनेबाबत निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमीत करुन पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| | संबंधित तालुक्याचे आमदार<br>(तथापि, एकाच मतदार संघात दोन तालुके असल्यास दुसऱ्या तालुका क्रीडा संकुलासाठी विधान परिषद सदस्यांचा अध्यक्ष म्हणून प्राध्यान्याने विचार करण्यात येईल.) | : | अध्यक्ष |
| १. | तहसिलदार | : | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी | : | सदस्य |
| ३. | महानगरपालिका/नगरपालिका/पंचायत समिती यांचा प्रतिनिधी (अधिकारी) | : | सदस्य |
| ४. | वॉर्ड अधिकारी/ मुख्य अधिकारी,नगर परिषद / ग्राम विकास अधिकारी (संबंधित) | : | सदस्य |
| ५. | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग/ नगरपरिषदा/महानगरपालिका अथवा त्यांचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| ६. | गटशिक्षण अधिकारी | : | सदस्य |
| ७. | तालुका क्रीडा अधिकारी अथवा संबंधित क्रीडा अधिकारी (वर्ग-३) | : | सदस्य सचिव |

**<u>आंमत्रित सदस्य :-</u>**

अ) शारिरीक शिक्षण शिक्षक, तालुका क्रीडा मंडळे यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी.

आ) तालुका मुख्याध्यापक, शारिरीक शिक्षण शिक्षक संघटना प्रतिनिधी.

इ) तालुक्यातील राष्ट्रीय व राज्य पातळीवरील खेळाडूंचा एक प्रतिनिधी.

ई) तालुक्यातील महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचा एक सदस्य.

**<u>समितीची कार्यकक्षा :-</u>**

१) संबंधित तालुक्यामध्ये आवश्यक असलेल्या/ मागणी करण्यात आलेल्या क्रीडा विषयक/ खेळाबाबत उभारावयाच्या क्रीडा सुविधा विचारात घेऊन क्रीडा संकुलाची १ वर्षाच्या कालावधीमध्ये उभारणी करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे. त्यासंदर्भात अतिरिक्त निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आमदार विकास निधी व अन्य आर्थिक स्त्रोत निर्माण करणे.

२) उभारण्यात आलेल्या क्रीडा विषयक सुविधांचा महत्तम वापर करण्याच्या तसेच तालुका क्रीडा संकुलाची देखभाल / दुरुस्ती संदर्भात क्रीडा संकुलामध्ये आवश्यकतेनुसार केअर टेकरची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने उपाय योजना करणे.

३) संबंधित तालुक्याच्या क्षेत्रातील शाळा/महाविद्यालये यामधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी तालुका क्रीडा संकुलाचा वापर करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाय योजना करणे तसेच शालेय त्याचप्रमाणे अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे.

२. उपरोक्त सुधारित तरतूदीनुसार संबंधित मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडे संपर्क साधून तालुका क्रीडा संकुल समितीची पुनर्रचना करण्याची कार्यवाही सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी तातडीने पूर्ण करावी. या कार्यवाहीचा आढावा विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा यांनी घ्यावा. त्याप्रमाणे तालुका क्रीडा संकुल समित्यांच्या पुनर्रचनेचा एकत्रित अहवाल शासनास दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ पर्यत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने सादर करावा.

३. या शासन निर्णयातील तरतूदी शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२०१६३४०५०६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Narhar Joshi

Digitally signed by Sudhir Narhar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae398dc3198690b46b6cf9b227ff99cbbfa40f24b5beeb33a668bc465f937400, cn=Sudhir Narhar Joshi
Date: 2015.06.20 16:35:52 +05'30'

( सु.न.जोशी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
४) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
५) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६) सर्व विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा.
७) सर्व विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद.
८) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई.
९) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रबंधक, लोकआयुक्त व उपआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१४) सर्व विभागीय आयुक्त.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
१७) आयुक्त, शिक्षण, पुणे.
१८) शिक्षण संचालक, प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक,पुणे.
१९) अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, पुणे.
२०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२१) सर्व विभागीय उप संचालक, क्रीडा व युवक सेवा.
२२) सर्व जिल्हा / तालुका क्रीडा अधिकारी.

२३) सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई.

२४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

२५) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

२६) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई.

२७) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.

२८) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.

२९) अवर सचिव, (क्रीयुसे - २, क्रीयुसे- ३)

३०) निवडनस्ती, क्रीयुसे-१.